देशोन्नती

# माहूर येथे कृषी विभागातर्फे कृषी दिन साजरा

देशोन्नती वृत्तसंकलन

**माहूर** : हरीत क्रांतीचे प्रणेते माजी मुख्यमंत्री कै. वसंतराव नाईक यांचा १ जुलै जन्म दिवस हा कृषी दिन म्हणून कै. वसंतराव नाईक सभागृह पंचायत समिती येथे १११ वी जयंती कृषी  दीन म्हणून साजरी करण्यात आली.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष गटविकास अधिकारी सुरेश कांबळे तर प्रमुख पाहुणे माजी जि. प. उपाध्यक्ष समाधान जाधव, माजी जि .प. सदस्य ज्योतिबा खराटे , माहूर पंचायत समितीचे माजी सभापती नामदेवराव कातले,उमेश जाधव,नागोराव मडावी. माजी पं. स. सदस्य किसनराव राठोड, डॉ. निरंजन केशवे, अनिल रूणवाल, बाळासाहेब देशमुख यांची मंचावर उपस्थिती होती. यावेळी मान्यवरांनी माजी मुख्यमंत्री कै. वसंतराव नाईक यांचे योगदान व त्यांच्या जिवन चारीत्र्यावर प्रकाश टाकण्यात आला तर कृषी शास्त्रज्ञ एस. एच. जायभाये यांनी कापूस, सोयाबीन व तुर पिकाबद्दल मार्गदर्शन केले, तसेच कृषीनिष्ठ शेतकरी पुरस्कारप्राप्त प्रमोद बेहरे व



संजय गायकवाड यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. मान्यवरांच्या हस्ते पंचायत समिती परीसरात वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी नंदू संतान, विजय आमले, अमित पवार, कृषी अधिकारी, रणवीर एस. जी. कृषी अधिकारी, तसेच तालुक्यातील सर्व प्रगतशिल शेतकरी, कृषी सेवा केंद्र धारक, सरपंच, कार्यालयीन अधिकारी व कर्मचारी बहुसंख्येने उपस्थित होते. सदर कार्यक्रमाचे सुत्रसंचलन जी. बी. सूर्यवंशी कृ. स. यांनी केले तर प्रस्तावना एस. यु. गडगीळे पं. स. कृषी अधिकारी यांनी केली वआभार प्रदर्शन गावंडे वि. अ. यांनी केले. (ता. प्र.)